**<u>रे. मु. नं. ४९३/२०१३</u>**

फुलाबाई त्रिंबक आंधळे
विरुध्द
विलास यशवंता आंधळे व इतर

## <u>निशाणी क. १९ वरील आदेश</u>

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज तालुका निरिक्षक भुमि अभिलेख, पाथर्डी यांना कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करुन वाद मिळकतीची मोजणी करणेसाठी दिवाणी संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे वकिल श्री. आर. एन. खेडकर यांनी युक्तिवाद केला की, वादीने मूळ दावा वाद मिळकतीचे मे. उपअधिक्षक भूमी अभिलेख, ता. पाथर्डी यांचेकडून मोजणी होवून हद्दी निश्चित करून मिळण्यासाठी व कायमचा मनाई हूकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे वकीलांनी पुढे असा युक्तीवाद केला की, मौजे जिरेवाडी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर येथील जमिन मिळकत १-अ व १-ब म्हणजे गट नंबर २२६ एकूण क्षेत्र १७ आर मधील पूर्वेकडिल ११ आर क्षेत्र हे वादी हिचे कब्जेवहिवाटीची मिळकत आहे व पश्चिमेकडिल ६ आर क्षेत्र हे प्रतिवादी यांचे कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. वादीने मूळ दावा वाद मिळकतीची मोजणी होवून वाद मिळकतीच्या हद्दी खुणा निश्चीत करणेसाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. सदर मिळकत १-अ ची मोजणी होवून हद्दी खुणा निश्चित करणे वादीचया दृष्टीने न्यायाचे व हिताचे आहे. तसेच, मोजणी झाल्यास प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान नाही. वादी मोजणी शुल्क व आवश्यक कागदपत्रे जमा करण्यास तयार आहे. सबब, वाद

मिळकतीची मोजणी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, पाथर्डी यांची नेमणूक करुन करावी अशी विनंती वादीने केली.

**३.** वादीच्या वकीलांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी खालील केसमध्ये दिलेला न्यायनिर्णय न्यायालयासमोर दाखल केला. **Bento Antonio Gomes @ Antonio Bento Gomes Vs. Rosario Salvador Carneiro and others, 2014(4) Mh.L.J. 366.** सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यातील बाबी या प्रस्तुत दाव्याशी संलग्न नसल्यामुळे त्यातील न्यायनिर्णयाचे अवलोकन केलेले नाही.

**४.** प्रतिवादीचे वकील श्री. जे. टी. बटुळे यांनी निशाणी १९ वरील अर्जास त्यांचे म्हणणे दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचा सदरचा अर्ज व दावा चुकीचा व बेकायदेशीर आहे. त्यामुळे वादीने दाव्यात व सदर अर्जात दावा मिळकतीच्या चतु:सिमा लिहिलेल्या नसल्याने वादीची नेमकी दावा मिळकत कोठे आहे याबाबत वादीला खात्री नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. तसेच वाद मिळकतीच्या पश्चिम बाजूने वादीचे ११ आर क्षेत्र आहे व पूर्व बाजूला प्रतिवादीचे ६ आर क्षेत्र आहे. त्याच्या क्षेत्रालगत त्याची वडिलोपार्जित जमिन गट नं. २२७ आहे. वाद मिळकतीची अदयाप पोटहिस्से फाळणी झालेली नाही. त्यामुळे हद्दी ठरल्याशिवाय वाद मिळकतीची मोजणी करणे न्यायास धरुन नाही. सबब, वादीचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**५.** मी दावा, अर्ज व अर्जावरील म्हणण्याचे तसेच दाव्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. वादीने मूळ दावा वाद मिळकतीची मोजणी होवून हद्दीच्या खुणा निश्चित

करण्यासाठी व कायम मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याचे संविस्तर अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने चतुःसिमा दाव्यात दिल्या नाहीत म्हणून त्याचा अर्ज नामंजूर करावा असे कथन केले आहे. याउलट, वादीने सदर वाद मिळकत १-अ ही तिची स्वतंत्र मालकी हक्क कब्जे वहिवाटीत असल्याचे कथन केले आहे. त्यासाठी वादीने निशाणी ८ प्रमाणे वाद मिळकतीचा ७/१२ दाखल केला आहे. त्यावर तिचे नाव नमूद आहे. वादीच्या नावे एकूण ११ आर क्षेत्र ७/१२ उता-यावर दाखवले आहे. ज्याअर्थी ७/१२ उता-यावर वादीचे नावे क्षेत्र आहे, त्याअर्थी त्याला चतुःसिमा आहेत असे ग्राहय धरणे न्यायोचित होईल. प्रतिवादीने सदर मोजणी करण्यात चतुःसिमा नसल्यामुळे अडचणी येतील असा युक्तीवाद केला. त्याबाबत वादीला योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. मूळ दाव्याचा हेतू पाहता वादीचा प्रस्तुत अर्ज मान्य करणे अगत्याचे आहे. प्रतिवादींनी दाखल केलेल्या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले त्यातील बाबी प्रस्तुत दाव्याशी सुसंगत नसल्यामुळे त्याचा उल्लेख येथे टाळला आहे. सबब, दाव्याचा हेतू लक्षात घेता वादीचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे.

**६.** दाव्याच्या अस्तित्वाच्या व दोन्ही बाजूच्या न्यायाच्या दृष्टीने विचार केला असता दावा मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे असे दिसते. वादीने वाद मिळकतीची चतुःसिमा मोजणीसाठी उपअधिक्षक यांना देणे त्याच्यावर बंधनकारक आहे. वाद मिळकतीची मोजणी केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान दिसत नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करतो :-

**<u>आ दे श</u>**

**१)** निशाणी क. १९ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) तालुका निरिक्षक भुमि अभिलेख पाथर्डी यांना वाद मिळकत गट नंबर २२६ ची मोजणी करणेकामी कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३) तालुका निरिक्षक भुमि अभिलेख, पाथर्डी यांना आदेशित करण्यात येते की, नियमाप्रमाणे संबंधीत लोकांना मोजणी करण्यापुर्वी नोटीस काढुन मोजणी तारीख, वेळेची समज देवुन दावा मिळकतीची मोजणी करावी व मोजणी नकाशा आलेख सादर करावा.

४) वादीस आदेशित करण्यात येते की, मोजणीस आवश्यक ती सर्व कागदपत्रे तालुका निरिक्षक भुमि अभिलेख, पाथर्डी यांना पुरविण्यात यावीत व मोजणी फी परस्पर तालुका निरिक्षक भुमि अभिलेख, पाथर्डी कार्यालयात जमा करण्यात यावी.

५) आदेशाप्रमाणे रिट तयार करण्यात यावी.

खुल्या न्यायालयात सांगितले व घोषित केले.

दिनांक : ०३/११/२०१६

**( डॉ.डी.जी.पटवे )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पाथर्डी